# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

## (सकाळ)

जा.क्र. २५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०१/२०१८

**१) किराणा दुकानातील नगदी पैसे चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ११/०१/२०१८ चे २०.०० वा ते १२/०१/२०१८ चे ०८.०० वाजता. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन पाहनु फिर्यादीचे लोकमान्य किराणा दुकानाचा कुलुप तोडुन दुकानात प्रवेश करुन ड्राव्हर मधुन १,४०,७५०/–रु. चोरुन नेल्याने फिर्यादी हाजी ईदीस कासमभाई लध्दानी वय ५१ वर्ष, रा. पालांदुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. सुनगार पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**२) भांडण व शिवीगाळ करुन डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ११/०१/२०१८ चे २१.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादीचा जावई असुन फिर्यादीस माझी पत्नी माझ्या सोबत का पाठवत नाही? म्हणुन भांडण करुन शिवीगाळ करुन अंधारात कोणत्यातरी वस्तुने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) शेतातील मोटार पंपाची चोरी . :–**

दिनांक ११+१२/०१/२०१८ चे रात्र. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची पाहुन फिर्यादीचे शेतातील विहीरीवर लावलेली २ एचपी लक्ष्मी कंपनीची मोटार पंप किंमती ५,०००/–रु. ची व सेक्शन पाईपसह काढुन चोरुन नेल्याने फिर्यादी गुरुदेव वामन लिचडे वय ३५ वर्ष, रा. मोहदुरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) शासकीय कामात अडथळा निर्माण करुन दुखापत केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १२/०१/२०१८ चे १८.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी हे पोलीस युनीफार्मवर आपले स्टॉपसह वानिशा मोबाईल क्र. एमएच ३३/९४३९ ने पेट्रोलींग करीत असतांना सार्वजनिक रोडवर यातील आरोपीने भाजीपाल्याचा हातठेला लावुन रहदारीस अडथळा निर्माण करतांनी मिळुन आला त्यास फिर्यादी यांनी बाजुला करण्यास सांगीतले असता त्याने विरोध केला? फिर्यादी हे स्वत: दुर करण्याचा प्रयत्न करीत असल्याने त्याने फिर्यादी सोबत झटपट करुन शासकीय कामात अडथळा निर्माण करुन फिर्यादीस दुखापत केल्याने फिर्यादीचे रिपोर्ट व एमएलसी रिपोर्ट वरुन सरतर्फे फिर्यादी पोनी. गाडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३५३,३३२,२८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. .

**५) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी . :—**

दिनांक २८/१२/२०१८ चे १८.१५ वाजता. दरम्यान यातील फिर्यादी विनुघर रामधन साहुसाखळे वय १९ वर्ष, रा. नायगाव हा अनमोल सिडाम याचे सोबत सायकलने पवनी वरुन नायगाव येथे जात असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे सायकलला समोरुन चिचखेडा पुर्नवसन ते नायगाव येथे धडक मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. .

**६) ट्रकच्या धडकेत एक जखमी . :—**

दिनांक १०/०१/२०१८ चे ११.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी गजानन शंकरराव येडणे वय ५७ वर्ष, रा. नागभिड जि. चंद्रपुर हा नागभिड येथुन पवनी येथे त्याचे मोटार सायकल स्कुटी क्र. एमएच ३६ क्यु ७१५० ने येत असतांना बेटाळा गावा जवळ समोरील रोडवर मागेहुन येणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकल ला बेटाळा येथे धडक मारुन जखमी केल्याने फिर्यादी एमएलसी रिपोर्ट व प्राप्त बयाना वरुन टपाला व्द्रारे पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १३४,१८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. .

**७) अवैध दारु/जुगार अड्डयांवर धाडी . :—**

दिनांक १२/०१/२०१८रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन पवनी, भंडारा व तुमसर येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०५ लिटर देशी दारू किंमती १५७५/—रु. तसेच जुगारातुन किंमती ४६५/—रु. असा एकुण २,०४०/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

(पो. नी. एस. आर. तेलुरे )
**जिवीशा शाखा**
**भंडारा**
**दुरध्वनी क्र.९९२१२५३५४९**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत:** संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.